# विद्यापीठात आज प्रा. डॉ. जुआन गार्सिया-बेलिडो स्पेन यांचे गुरुत्वाकर्षण तरंगाचे विज्ञान या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील भौतिकशास्त्र संकुलच्या वतीने स्पेनमधील युनिव्हर्सिदाद ऑटोनोमा डी माद्रिद येथील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. जुआन गार्सिया-बेलिडो यांचे **गुरुत्वाकर्षण तरंगाचे विज्ञान** या विषयावर विशेष व्याख्यानाचे आज **दि. २० जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता** आयोजन करण्यात आले असून या व्याख्यानाचा लाभ घ्यावा असे आवाहन **विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ अशोक महाजन, अधिष्ठाता डॉ एम. के. पाटील व संकुलचे संचालक डॉ राजाराम माने** यांनी केले आहे.

शतकानुशतके, खगोलशास्त्र या विषयाचा अभ्यास हा केवळ विद्युतचुंबकिय तरंगाच्या निरीक्षणावर अवलंबून होते. तथापि, ई.स. २०१५ पासून या क्षेत्रात एका नवीन युगाची सुरुवात झाली असून सुमारे एक शतकापूर्वी आइन्स्टाईनने भाकीत केलेल्या अवकाश व काळ या चारमिती रचनेतील लाटा, म्हणजेच गुरुत्वाकर्षण लहरींच्या शोधाने विश्वाकडे पाहण्यासाठी एक क्रांतिकारक दालन उघडले आहे. दोन कृष्णविवरांच्या टक्करीतून, न्यूट्रॉन तार्‍यांपासून ते बिग बँगच्या प्रतिध्वनींपर्यंतचे गूढ या नवीन संदेशवाहक तरंगाच्या माध्यमातून आपल्याला विश्वातील सर्वात शक्तिशाली आणि रहस्यमय घटनांचा शोध घेण्यास मदत होत आहे.

विश्वरचनाशास्त्र आणि गुरुत्वाकर्षण लहरींच्या सिद्धांतातील एक अग्रगण्य तज्ज्ञ असलेले प्रा. जुआन, हे या रोमांचक क्षेत्रावर आणि महत्त्वाकांक्षी 'लायगो-इंडिया मेगा सायन्स प्रोजेक्ट'च्या महत्तेवर प्रकाश टाकणार आहेत. या व्याख्यानात प्रा. जुआन गुरुत्वाकर्षण लहरींमागील विज्ञान, या लहरीच्या ऐतिहासिक शोधाची कहाणी, कृष्णविवरे, विश्वाची उत्पत्ती आणि भौतिकशास्त्राच्या मूलभूत नियमांविषयीची रहस्ये उलगडण्यासाठी असलेल्या त्यांच्या विलक्षण क्षमतेचा परिचय करून देतील.

या व्याख्यानाचे आयोजन सर्वसामान्य श्रोते, विज्ञान प्रेमी विद्यार्थी, नागरिक यांच्यासाठी करण्यात आले असून या व्याख्यानाच लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन **विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मनोहर चासकर, प्र-**

**कुलगुरू डॉ अशोक महाजन, अधिष्ठाता डॉ एम. के. पाटील व संकुलचे संचालक डॉ राजाराम माने** यांनी केले आहे.